**पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव**
**फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११**
**Email ID:-**sp.jalgaon@mahapolice.gov.in

जनसंपर्क अधिकारी
**दिनाक - १६/०३/२०२६**

प्रति,
मा.संपादक,
---------------------

विषय: जळगाव जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२५ लेखी परीक्षेचा निकाल आणि सुधारित उत्तरतालिका प्रसिद्धीबाबत.

जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२४-२५ पोलीस शिपाई भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत एम.जे. कॉलेज, जळगाव येथे यशस्वीरीत्या संपन्न झाली आहे. सदर परीक्षेची प्राथमिक उत्तरतालिका परीक्षेच्या दिवशीच अधिकृत संकेतस्थळावर आणि सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली होती.

सुधारित उत्तरतालिका (Revised Answer Key)

प्राथमिक उत्तरतालिकेवर प्राप्त हरकतींचा विचार करून, एका प्रश्नाच्या उत्तराचा पर्याय संचनिहाय खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आला आहे:

प्रश्न संच A: प्रश्न क्रमांक ५३ - सुधारित उत्तर पर्याय (A)
प्रश्न संच B: प्रश्न क्रमांक २८ - सुधारित उत्तर पर्याय (A)
प्रश्न संच C: प्रश्न क्रमांक ३ - सुधारित उत्तर पर्याय (A)
प्रश्न संच D: प्रश्न क्रमांक ७८ - सुधारित उत्तर पर्याय (A)

निकाल प्रसिद्धी आणि उमेदवारांसाठी सूचना :-

लेखी परीक्षेचा निकाल जळगाव पोलीस दलाच्या अधिकृत संकेत स्थळावर www.jalgaonpolice.gov.in आणि पोलीस मुख्यालय जळगाव येथील सुचनाफलकावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

हरकती सादर करणे :-

प्रसिध्द केलेल्या निकालाबाबत उमेदवारांना काही हरकती सादर करावयाच्या असल्यास त्यांनी दिंनाक १८/०३/२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत पोलीस अधिक्षक कार्यालय जळगाव येथे लेखी स्वरुपात व प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर कराव्यात.

महत्वाची नोंद :- विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकतीचा कोणताही विचार केला जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सदरची भरती प्रक्रीया पुर्णपणे पारदर्शक आणि गुणवत्ता तत्वावर राबविण्यात येत असुन,पुढील निवडीबाबतच्या सुचना यथावकाश देण्यात येतील.**

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय जळगाव